# खाद्यतेलाच्या स्वावलंबनासाठी निश्चित धोरण गरजेचे







देशामध्ये २७ लाख टन मोहरी, १९ लाख टन सोयाबीन, १२ लाख टन भुईमूग, ३ लाख टन पामतेल आणि ६०,००० टन सूर्यफूल तेलाचे उत्पादन होते. दरवर्षी ३२ लाख टन सोयाबीन, ८५ लाख टन पामतेल तर २५ लाख टन सूर्यफुलाच्या तेलाची आयात केली जाते. सोयाबीन तेलाची आयात अर्जेंटिनामधून केली जाते. सूर्यफूल तेलाची आयात युक्रेन, रशिया, अर्जेंटिना या देशांतून केली जाते तर पामतेल इंडोनेशिया, मलेशिया या देशांतून आयात केले जाते. रशिया- युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाले आणि सूर्यफूल तेलाची आयात बंद झाली. परिणामी खाद्यतेलाचा पुरवठा कमी झाल्यामुळे खाद्यतेलाच्या किंमतीमध्ये ३० ते ४० टक्के वाढ झाली.

खाद्यतेलाची दरवर्षीची मागणी २५० लाख टन असताना देशात त्याची १०५ लाख टन निर्मिती होते तर १४५ लाख टन खाद्यतेलाची आयात होते. १३८ कोटी लोकसंख्या आणि त्यात दररोज होत असलेली वाढ तसेच तेलाची वाढती मागणी याचा विचार करता पुढील पाच वर्षांत १७ टक्के खाद्यतेलाची जास्तीची गरज भासणार आहे. म्हणजेच पुढील पाच वर्षात खाद्यतेलाची मागणी ३०० लाख टनांपर्यंत जाऊ शकते. खाद्यतेलाच्या देशांतर्गत उत्पादनाचा विचार केला तर हा वृद्धी दर फक्त २ टक्के आहे. म्हणजेच याच गतीने आपल्या देशात खाद्यतेलाचे उत्पादन सुरू राहिले तर जास्तीत जास्त ११०- ११५ लाख टनांपर्यंत खाद्यतेलाचे उत्पादन वाढू शकते. या सर्व आकडेवारीवरून खाद्यतेलाच्या नगण्य उपलब्धतेबद्दल धोक्याची घंटा वाजत असल्याचे जाणवते. ही बाब कृषिकेंद्री धोरणाला आणि एकूणच अर्थव्यवस्थेला तसेच देशाच्या स्वाभिमानाला धक्का देणारी आहे. खाद्यतेलाच्या आयातीवरील खर्च कधी एक लाख कोटी रुपयांच्या घरात जाईल हे सांगता येणार नाही. यासाठी देशांतर्गत मोठ्या प्रमाणात तेलबिया उत्पादनात क्रांती करण्याची गरज आहे. आपल्या देशाने कापूस, ऊस, अन्नधान्ये, भाजीपाला, कडधान्ये, फळे आणि दुग्ध व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात क्रांती केली. मात्र तेलबिया उत्पादनात आपण का मागे आहोत, याचा प्रामुख्याने विचार होणे महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तेलबियांसाठी ठरवलेल्या आधारभूत किंमती. खरं तर ज्यावेळी एखाद्या शेती उत्पादनामध्ये वाढ करावयाची आहे त्याच्या आधारभूत किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची गरज असताना, आजही या पिकांच्या किंमतीमध्ये अल्प प्रमाणात वाढ झालेली आहे. मागील वर्षी सोयाबीनसाठी ७० रुपये (३९५०/-), भुईमूग- २७७ रुपये (५५५०/-), मोहरी- ४०० रुपये (५०५०/-), सूर्यफूल- १३० रुपये (६०१५/-) आणि करडईसाठी ११४ रुपये (५४४१/-) या प्रमाणात दरामध्ये वाढ केली. ही दरवाढ फक्त २ ते ५ टक्के आहे. याउलट तेलाच्या किंमतीमध्ये ३० ते ४० टक्के वाढ झाली. या पिकांखालील क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करावी लागेल. तसेच या पिकांवर प्रक्रिया उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभाच्या योजना तसेच पायाभूत सेवासुविधा वाढवाव्या लागतील.

**आधारभूत किंमतीमध्ये तेलबिया पिके दुर्लक्षित**

आजही देशामध्ये गहू, तांदूळ, ऊस, कापूस या पिकांच्या आधारभूत किंमती वाढविण्याचा जेवढा जाणीवपूर्वक विचार केला जातो, त्या प्रमाणात तेलबिया पिकांचा विचार होताना दिसत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे हे पीक कमी प्रतीच्या तसेच कमी सिंचन असलेल्या कोरडवाहू जमिनीत घेतले जाते. त्यामुळे उत्पादकता कमी आहे. जगाच्या सरासरी उत्पादनाच्या फक्त ५० टक्के उत्पादकता भारतामध्ये आहे. तृणधान्ये पिकांसाठी ७० टक्के बागायती क्षेत्र आहे तर तेलबियांसाठी फक्त २२ टक्के बगायती क्षेत्र वापरले जाते. यामुळे तेलबिया पिके घेणे शेतकऱ्यांना किफायतशीर होत नाही. शेवटी शेतकरी ज्या पिकांपासून जास्त नफा मिळेल त्याच पिकांचे उत्पादन घेईल ना! शेतकऱ्यांना देशाच्या स्वावलंबनापेक्षा स्वत:च्या आर्थिक फायद्याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. खाद्यतेलाच्या



उत्पादन तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल करून त्याचा प्रचार- प्रसार करणे गरजचे आहे. जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या नवनवीन जाती, अन्नद्रव्ये व्यवस्थापन, पीक संरक्षण, सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन, काढणीपश्चात तंत्रज्ञान यामधील गॅप शोधून; त्या संदर्भातील तंत्रज्ञान विकसित करून त्याचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणे गरजेचे आहे.

नव्वदच्या दशकामध्ये तेलबिया अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमामुळे तेलबियांचे उत्पादन ९० लाख टनांवरून ३३० लाख टनांपर्यंत पोहोचले. पण नंतरच्या काळात उत्पादन वाढीचा वेग मंदावला. आताही भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय तेलबिया अभियान राबविण्यात येत असून, ११००० कोटी रुपयांचे प्रावधान केले आहे. यामध्ये पामतेलाच्या वृद्धीवर विशेष भर देण्यात येत आहे. सध्या देशांतर्गत ३ लाख टन पामतेलाचे उत्पादन होत

असून, याचे उत्पादन २०२६ पर्यंत १० लाख टन, तर २०३० पर्यंत २८ लाख टन वाढविण्याचा कृती कार्यक्रम शासनाने तयार केला आहे. अर्थात शासनाचे धोरण या पिकासाठी ज्या प्रमाणात पोषक असेल, त्या प्रमाणातच या उत्पादन वाढीच्या आकडेवारीमध्ये आपण प्रगती करू शकतो. पारंपरिक तेलबियांपासून हेक्टरी एक टन खाद्यतेलाचे उत्पादन मिळते. पामतेलाचा विचार केला तर हेच उत्पादन हेक्टरी ४ ते ५ टनांपर्यंत मिळते. म्हणजेच पामतेलाचे हेक्टरी उत्पादन जास्त असले तरी बहुवर्षीय- उशिरा येणारे पीक, काढणी करताना येणाऱ्या मजुरांच्या अडचणी; पाण्याची जास्त आवश्यकता यामुळे या पिकाचे शेतकऱ्यांना आकर्षण वाटत नाही. या सर्व बाबींवर उपाययोजना केली तर भारतामध्ये १९ लाख हेक्टर क्षेत्रावर माडाची लागवड होऊन ७६ लाख टन पामतेलाचे उत्पादन मिळू शकेल. असे झाले तर पामतेलाच्या बाबतीत भारत पूर्णपणे स्वावलंबी होऊ शकतो.

**'राईस ब्रान ऑईल'चा लाभदायी पर्याय**

खाद्यतेल बियांच्या उत्पादन तंत्रज्ञानामध्ये सुधारणा करून त्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार- प्रसार करण्यासाठी कृषी विद्यापीठे, भारतीय अनुसंधान परिषदेच्या सर्व संस्था तसेच कृषी विभाग यांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. तसेच या तंत्रज्ञानामधील गॅप भरला तर यापुढे आहे त्याच क्षेत्रामध्ये ३६ लाख टन अतिरिक्त तेलाचे उत्पादन वाढविता येईल. पीक पद्धतीमध्ये बदल करण्याची नितांत गरज आहे. भात पिकाच्या क्षेत्रामध्ये भातानंतर सूर्यफूल, मोहरी या रब्बी हंगामातील पिकांची लागवड वाढविली तर तेलबियांच्या क्षेत्रात वाढ होऊ शकते. तसेच काही पिकांमध्ये आंतरपीक म्हणूनही तेलबिया पिकांची लागवड करता येईल. अपारंपरिक तेल म्हणजे राईस ब्रान ऑईल. बदलती जीवनशैली आणि आरोग्याविषयी जागरूक असलेल्या समाजामध्ये राईस ब्रान तेलाला मोठी मागणी आहे, ज्यामुळे हृदयविकार तसेच मधुमेहाचे आजार कमी होतात. तांदूळ तयार करण्याच्या व्यवसायात एकूण तांदूळ निर्मितीच्या ८.५ टक्के राईस ब्रान मिळते. त्यात १५ टक्के तेलाचे प्रमाण असते. भारतातील सर्व तांदूळ निर्मिती उद्योगातील या घटकाचा वापर केला तर २० लाख टनांपर्यंत खाद्यतेलाची निर्मिती होऊ शकते. अर्थात यासाठी आवश्यकतेनुसार सेवासुविधा, यंत्रणा आणि अर्थसहाय्य देण्याची गरज आहे.

**तेलबिया पीक लागवडीला प्रोत्साहन हवे**

महाराष्ट्राचा विचार केला तर संपूर्ण मराठवाडा तसेच विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रामध्ये तेलबियांचे क्षेत्र तसेच उत्पादन वाढविण्याला फार मोठी संधी आहे. सूर्यफूल, मोहरी, करडई या पिकांखालील क्षेत्रामध्ये वाढ करायला फार मोठा वाव आहे. पावसावरील शेतीमध्ये तेलबियांची लागवड करण्यासाठी ठोस योजना तयार केली तर महाराष्ट्र खाद्यतेल उत्पादनामध्ये आघाडी घेऊ शकतो. तेलबिया पिकांमध्ये मधमाशी पालनासारख्या व्यवसायाला प्रोत्साहन दिले तर तेलबियांच्या उत्पादनात परागीभवनाच्या माध्यमातून २० ते २५ टक्के वाढ होईल. तसेच ग्रामीण भागातील तरुणांना मधमाशी पालन हा शेतीपूरक व्यवसाय उपलब्ध होईल. मधमाशी पालनातून हजारो उद्योजक तयार होऊन कोट्यवधी रुपयांचे तेलबिया उत्पादन तसेच मध आणि इतर पदार्थांचे उत्पादन मिळेल. जिरायत भागातील शेतकरी आणि तरुणांना याचा मोठा फायदा फायदा होईल. यावर्षी भारत सरकारने जीएम तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या सोयाबीनची आयात करून, खाद्यतेलाचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. परंतु विरोधाभास असा की, ज्या देशात जीएम सोयाबीनच्या लागवडीला विरोध आहे, तेथेच त्याची आयात करून वापर करायला कशी परवानगी मिळाली हे समजत नाही! म्हणजेच येथे धोरणात्मक औचित्याचे तत्त्व पाळले गेले नाही.

खरं तर जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी जागतिक पातळीवर सुरू असलेल्या सर्व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. खाद्यतेलाच्या स्वावलंबानासाठी जीएम तंत्रज्ञानाला परवानगी दिली तर फक्त या एकाच तंत्रज्ञानामुळे भारतातील खाद्यतेलाच्या उत्पादनात २० ते ३० टक्के वाढ होईल. अर्थात यावर सामुदायिक चर्चा होणे महत्त्वाचे आहे आणि यातून जो निर्णय होईल त्याच्याशी बांधिलकी असणे गरजेचे आहे. जसे आज तेलबिया आयात- निर्यात धोरण, त्यादृष्टीने घ्यावयाचे निर्णय याविषयी केंद्र शासनाने धरसोडीची धोरणे बदलून ठाम धोरण स्वीकारावे. संपूर्ण विचारांती पाच- दहा वर्षांचे खाद्यतेल स्वावलंबनाचे धोरण राबविले तर नक्कीच याचा चांगला परिणाम दिसेल. ज्याप्रमाणे हरितक्रांती, धवलक्रांती, फलोत्पादन क्रांती या सर्वांमध्ये संशोधन- विस्तार यंत्रणेने एकत्रित प्रयत्न करून देशाला आघाडीवर आणून स्वावलंबन मिळविले; तसेच प्रयत्न खाद्यतेल स्वावलंबनासाठी होणे गरजेचे आहे. खाद्यतेलाचा विषय आज गांभीर्याने घेतला नाही तर भविष्यकाळ मात्र कोणालाच माफ करणार नाही, हे देखील लक्षात घ्यावे.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■